Sponsored Content
Ads by adgebra

SBI लाइफसोबत निवृत्ती निधी तयार करा आणि चॅम्पियन प्रमाणे निवृत्त व्हा.
AD SBI Life

Get ₹1CR Cover at ₹512/ month. No GST adds mor...
AD SBI Life

Official Cummins DG Sets
AD Cummins India

मुकुल माधव विद्यालयात 18 वे वार्षिक आरोग्य तपासणी शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न

Print Email

15 शाळांतील 2,562 विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी; पहिल्या दिवशी 458 विद्यार्थ्यांची तपासणी पूर्ण

आणखी शोधा
सरकारी माहिती
भारतीय संस्कृती पहा
नकाशे पहा

रत्नागिरी : मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मुकुल माधव विद्यालयात आयोजित करण्यात आलेले 18 वे वार्षिक सर्वसमावेशक आरोग्य तपासणी शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात आणि यशस्वीरीत्या पार पडले. विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी 2008 पासून सातत्याने राबविण्यात येत असलेला हा उपक्रम ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या निरोगी भविष्यासाठी मोलाचे योगदान देत आहे.

या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे संचालक (तांत्रिक) श्री. रामबाबू सांका, फॅक्टरी मॅनेजर श्री. सागर चिवटे तसेच श्री. आशिष आठवले उपस्थित होते. विविध प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.

शिबिरामध्ये पुणे व रत्नागिरी येथील अनुभवी आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने विद्यार्थ्यांची सर्वांगीण आरोग्य तपासणी केली. यामध्ये पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयाचे 5 डॉक्टर, सिंबायोसिस मेडिकल कॉलेजचे 6 डॉक्टर, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे नेत्रतज्ज्ञ पथक, ड्रम्किनो आय हॉस्पिटलचे 2 नेत्ररोगतज्ज्ञ, रत्नागिरी येथील देसपांडे डेंटल हॉस्पिटल व श्री डेंटल क्लिनिकचे दंतचिकित्सक तसेच पारकर हॉस्पिटलचे डॉक्टर सहभागी झाले होते. याशिवाय बालरोग, कान-नाक-घसा (ईएनटी), नेत्ररोग, त्वचारोग, दंतचिकित्सा आणि स्त्रीरोग या विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची सखोल आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले.

आणखी शोधा
इतिहास वाचा
गाईड वाचा
शहर शोधा

शिबिराच्या पहिल्याच दिवशी मुकुल माधव विद्यालयातील 458 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, दृष्टी तपासणी, दंत तपासणी आणि विविध वैद्यकीय चाचण्यांचा समावेश होता.

विशेष म्हणजे, 22 ते 27 जून या कालावधीत हा उपक्रम पावस परिसरातील 15 शाळांमध्ये राबविण्यात येणार असून एकूण 2,562 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. दरवर्षी या उपक्रमाद्वारे 5,000 हून अधिक विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना आवश्यक ते वैद्यकीय मार्गदर्शन व पाठपुरावा सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

हा उपक्रम केवळ आरोग्य तपासणीपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि सर्वांगीण विकास याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. तसेच पालकांमध्ये मुलांच्या आरोग्याची नियमित काळजी, योग्य आहार आणि वेळेवर वैद्यकीय तपासणीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. सर्व वैद्यकीय सेवा व तपासण्या पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमादरम्यान सहभागी डॉक्टर व आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांचा त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मुकुल माधव फाऊंडेशनचे डॉ. अनुप करमरकर, वरद गोरे, शामराव निंबाळकर आणि सौ. यास्मिन यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यालयाचे प्राचार्य श्री. रोहित देशपांडे यांनी उपस्थित डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, मुकुल माधव फाऊंडेशन, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड, स्वयंसेवक आणि सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

यावेळी मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ. रितू प्रकाश छाब्रिया यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि समाजकल्याणाप्रतीं असलेल्या दृढ बांधिलकीमुळे हा आरोग्य उपक्रम गेली अठरा वर्षे यशस्वीपणे सुरू आहे. त्यांच्या प्रेरणेतून हजारो विद्यार्थी आणि कुटुंबांना मोफत आरोग्यसेवेचा लाभ मिळाला असून शिक्षण, आरोग्य आणि समाजविकासाच्या क्षेत्रात अनेक लोकाभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत.

गेल्या अठरा वर्षांत हे वार्षिक आरोग्य तपासणी शिबिर एक आदर्श सामाजिक उपक्रम म्हणून विकसित झाले आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य, शिक्षण आणि सर्वांगीण विकास यासाठी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांची असलेली सामाजिक बांधिलकी या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

Share 0 Tweet Share Share

« Previous
गोंदिया जिल्ह्यातील कृषी विकासाच्या सर्व प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

Next »
अमान्य इंडियाने रस्ते बांधकाम क्षेत्रातील पुनर्वापर तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी आणले भागधारकांना एकत्र

RELATED ARTICLES

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची दसरा दिवाळी ठेव योजना
October 11, 2026

सहकारी संस्था केवळ वित्त पुरवठादार नाहीत, त्यांचा बहुआयामी सहभाग सुनिश्चित केला पाहिजे: एंड. दीपक पटवर्धन
October 11, 2026

स्वरूपानंद पतसंस्थेच्या दसरा दिवाळी ठेव योजनेचा शुभारंभ
October 11, 2026

आणखी शोधा
भारतीय संस्कृती पहा
नकाशे पहा
इतिहास वाचा